## नियमित.मु.क्र. २१५/२००४ मधील निशाणी २२१ वरील आदेश

## ( CNR MHAH23-000263-2004)

१. प्रतिवादी क्र. १० ते १७ यांनी प्रस्तुतचा अर्ज नि.क्र. १९९ वर झालेला ''उलट तपास नाही'' असा आदेश रद्द करून पुरावा सादर करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. ३ याने प्रतिदाव्याची प्रत मिळाली नाही म्हणून तक्रार उपस्थित केलेली होती त्यानुसार प्रतिदाव्याची प्रत देण्यात आली. त्यामुळे प्रतिदाव्याच्या कैफीयतीकरिता कामकाज नेमले गेले. तसेच प्रतिवादी क्र. १३ हा आजारी असल्याने न्यायालयात उपस्थित राहू शकला नाही. त्यामुळे उलट तपास नाही असा आदेश झालेला आहे. तो रद्द करुन पुरावा देण्याची परवानगी प्रतिवादींनी मागितलेली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुतच्या अर्जावरच म्हणणे दिलेले आहे. त्यांनी प्रतिवादींचा अर्ज खरा व प्रामाणिकपणाचा नसून दाव्याचे कामकाज लांबणीवर टाकणेसाठी दाखल केला आहे असे कथन केले आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. जर प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र असल्यास, वादीस रक्कम रु. ३,०००/- खर्चाची रक्कम म्हणून देण्यात यावी अशी विनंती केली.

४. वादी व प्रतिवादी यांच्या परस्पर विरोधी कथनांचा विचार करता प्रकरणाच्या अंतिम निष्कर्षापर्यंत येण्यासाठी खालील वादप्रश्न मांडण्यात आले, ते मुद्दे कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे :-

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | प्रतिवादींनी उलटपास नाही हा आदेश रद्द करण्यासाठी पुरेसे कारण दर्शवून दिले आहे काय ? | ...होकारार्थी. |
| २. | काय आदेश ? | ...अंतिम आदेशानुसार |

## कारणमिमांसा

### वादप्रश्न क्र. १ व २ करिता :-

५. सदरकामी महत्वाची नमूद करावयाची बाब म्हणजे प्रतिवादींविरूध्द दिनांक २०/०१/२०१८ रोजी ''उलट तपास नाही'' असा आदेश झालेला आहे. प्रतिवादी क्र. ३ याचा नि.क्र. २२४ चा अर्ज पाहता प्रकरण प्रतिवादी क्र. ३ च्या प्रतिदाव्याच्या कैफीयतीसाठी नेमले असल्याचे प्रतिवादी क्र. १३ याचा समज होणे नैसर्गिक आहे. याशिवाय सदरील प्रतिवादींतर्फे दाखल केलेला वैद्यकीय दाखला पाहता केवळ आजारपणामुळे प्रतिवादी क्र. १३ गैरहजर राहिल्याचे दिसून येत आहे. याठिकाणी महत्वाची नमूद करावयाची बाब म्हणजे दाव्याचा अंतिम निर्णय गुणदोषावर होण्यासाठी प्रतिवादी यांना पुरावा सादर करण्याची पूर्ण संधी देणे नैसर्गिक न्यायाचे होणार आहे. याशिवाय प्रतिवादींनी सादर केलेले कारण संयुक्तिक व पुरेसे वाटते.

६. सबब वरील सर्व बाबींचा एकत्रात विचार करता प्रतिवादींनी गैरहजर राहण्यासाठी पुरेसे कारण दर्शवून दिले असल्याचे माझे स्पष्ट मन झाले आहे. त्यामुळे झालेला ''उलट तपास नाही'' हा आदेश रद्द करून प्रतिवादींना पुरावा सादर करण्याची संधी देणे योग्य व न्यायाचे होणार आहे. झालेल्या विलंबाबाबत वादीला खर्चाची रक्कम दिल्यास न्यायाचे होणार आहे. त्यानुसार वादप्रश्न क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी काढून अर्ज मंजुर होण्यास पात्र असल्याने पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

## -: आदेश :-

१. प्रतिवादींचा नि.२२१ चा अर्ज खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२ प्रतिवादी यांनी वादीस खर्चाची रक्कम रु. १०००/- द्यावी.

खुल्या न्यायालयात आदेश पारित करुन घोषीत करण्यात आला.

श्रीगोंदा.
दिनांक : १८/०४/२०१८.

( कुं. म. कायंगुडे )
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा.